दूरध्वनी क्र. ०२०-२४४७६९३८
Email- preserviceedudept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३०.

जा.क्र.राशैसंप्रप/सेवापूर्व शिक्षण/प्रवेश कक्ष/२०२१-२२/3081 दि.२२/०९/२०२१

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
३) शिक्षक निरीक्षक मुंबई (दक्षिण)

**विषय**:- डी.एल.एड. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२१-२२ मधील शासकीय कोट्यातील रिक्त जागा विशेष फेरीद्वारे भरणेबाबत........

**संदर्भ** :- १. मा. आयुक्त (शिक्षण) यांची दिनांक२२/०९/२०२१ ची मान्य टिपणी
२. अध्यापक विद्यालयाची प्राप्त पत्रे ( दि.०२/०९/२०२१ ते ०७/०९/२०२१ )

राज्यस्तरीय समितीमार्फत राबविण्यात येणा-या राज्यातील अध्यापक विद्यालयातील शासकीय कोट्यातील डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाच्या तीन फे-या पूर्ण झालेल्या आहेत. तथापि अद्यापही शासकीय कोट्यातील जागा रिक्त राहिलेल्या आहेत. सदर रिक्त जागा विशेष फेरीद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरण्यास संदर्भीय मान्य टिपणीनुसार मा. आयुक्त (शिक्षण) यांनी परवानगी दिलेली आहे करिता याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

संबंधीत जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयनिहाय रिक्त जागांचा तपशील परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य पध्दतीने ऑनलाईन प्रवेश होतील.**

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दि.२४ सप्टेंबर २०२१ ते दि.२८ सप्टेंबर २०२१ या कालावधीत www.maa.ac.in या संकेतस्थळावरून भरावेत. पडताळणी अधिका-यांनी दि.२४ सप्टेंबर २०२१ ते दि.३० सप्टेंबर २०२१ या कालावधीत प्रमाणपत्रांची ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करावी.

२. या विशेष फेरीमधून इ.१२ वी उत्तीर्ण झालेले व नव्याने प्रवेश अर्ज भरण्यास इच्छुक असलेले विद्यार्थी, नियमित डी.एल.एड. प्रवेश प्रक्रियेत ऑनलाईन अर्ज पूर्ण न भरलेले submit/approve न केलेले विद्यार्थी, दुरुस्ती (Correction) न केलेले विद्यार्थी आणि ऑनलाईन प्रवेश फेरीतून प्रवेश न घेतलेले विद्यार्थी भाग घेऊ शकतील.

टीप!- वरील सूचनेनुसार सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की दि.२४/०९/२०२१ ते २८/०९/२०२१ पर्यंत D.El.Ed. (प्राथमिक शिक्षण पदविका) अभ्यासक्रम प्रवेशासाठी शासनातर्फे स्पॉट अॅडमिशन करण्यात आलेले आहे तरी इच्छुक उमेदवारांनी प्रवेशासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह या अध्यापक विद्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा.
दि.२४/०९/२०२१

Scanned by TapScanner